# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक १०/१२/२०२० (गुरूवार)

## चोरी

पोलीस ठाणे मौदा :– अंतर्गत दिनांक ०९/१२/२०२० चे ०३.३० वा. दरम्यान मौजा गुमथळा शिवारात टिप्पर क्र. एमएच ४०/बीएल ३४१० चा चालक कमलनाथ उर्फ कोमलकांत दिवाकर, वय ४० वर्षे, रा. डोंगरगाव, ता. कुही हा प्रकाश किशन ढोने, वय ४५, रा. डोंगरगाव, ता. कुही यांचे सांगणेवरून आपले टिप्परमध्ये ०४ ब्रास रेती किंमत १२,०००/– रु. ची विनापरवाना अवैधरित्या भरून चोरटी वाहतुक करतांना मिळुण आला. सदर प्रकरणी चालकाकडुन रेती व टिप्परसह एकुण किंमत २०,१२,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन दोघांविरूद्ध पोलीस ठाणे मौदा येथे कलम ३७९, १०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करून त्यांना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अरविंद मोहोड हे करीत आहेत.

## गोवंशीय जनावरांची अवैध वाहतुक

पोलीस ठाणे केळवद :– अंतर्गत दिनांक 08/12/2020 रोजी 12.00 वा. ते 21.45 वा. दरम्यान मौजा खुसापार शिवारात 06 चाकी आयसर वाहण क. एमपी 04/जीए 3196 चा चालक हा आपले वाहणामध्ये महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्या बंदी असतांना कोणत्याही प्रकारचा जनावर वहातुकीचा परवाना व जनावर खरेदी पावती न बाळगता ११ नग बैल–गोरे (गोवंशीय जनावरे) किंमत १,१०,०००/– रु. आणि ३५ मेलेले गोरे यांची चारा पाण्याची व्यवस्था न करता अत्यंत क्रुरतेने कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन अवैध वाहतुक करतांना मिळून आला. सदर प्रकरणी वाहण चालक हा मोक्यावरून फरार झाल्याने घटनास्थळावरून गोवंशीय जनावरे व वाहणासह ०५,१०,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्याचेविरूद्ध पोलीस ठाणे केळवद येथे कलम ४२९ भादंवि, सहकलम ११ (१),(ध),(ड),(च) प्राण्यांना निर्दयतेने वागविने प्रति.अधि, १९६०, सहकलम ५(अ) ९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधि. १९९५ सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधि. १९५१ सहकलम १९२ (अ) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अर्जुन राठोड हे करीत असुन आरोपीचा शोध सुरू आहे.

# दुखापत

पोलीस ठाणे कोंढाळी :– अंतर्गत दिनांक ०६/१२/२०२० चे १३.०० वा. ते १४.०० वा. दरम्यान मौजा पुसागोंदी तांडा येथिल फिर्यादी सौ. आशा बंडु चव्हाण यांचा मुलगा गावातील हॉस्टेलजवळ बॅट–बॉल खेळत असता मुलाचे अपंगत्वाचा फायदा घेवुन प्रकाश चव्हाण, रा. पुसागोंदी याने दारू पिवुन येवुन हातबुक्कीने मारून उजवा हात फ्रॅक्चर करून गंभीर जखमी केले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन आणि वैद्यकीय अहवालावरून पोलीस ठाणे कोंढाळी येथे प्रकाश चव्हाण याचेविरूद्ध कलम ३२५ भादंवि, सहकलम ९२ अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ अन्वये गुन्हा नोंद करून त्यास अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक श्री दारासिंग राठोड हे करीत आहेत.

पोलीस ठाणे काटोल :– अंतर्गत दिनांक ०९/१२/२०२० रोजी १०.३० वा. दरम्यान फिर्यादी सौ. पुनम योगेश निकाजु, वय ३६ वर्षे, रा. मरामाय नगर या घरी हजर असता त्यांचे पती योगेश पांडुरंग निकाजु हे दारू पिवुन घरी आले आणि हैदराबाद येथे जाण्याकरीता मुलाबाळासह तयार होण्यास सांगितले. यावर फिर्यादी यांनी नकार दिला असता त्याने झागडा भांडण करून लाकडी बॅटने फिर्यादीचे कानावर व डोक्यावर मारुन जखमी केले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे काटोल येथे योगेश पांडुरंग निकाजु याचेविरूद्ध कलम ३२४, ५०४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन त्यास अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक श्री संतोष आंधळे हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर.